# कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती - २०१९

## उमेदवारांना सर्वसाधारण सुचना

कोल्हापूर पोलीस दलाच्या आस्थापनेवरील ७८ पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी दि.०३/०९/२०१९ रोजी जाहिरात देण्यात आलेली होती. सदर भरतीकरीता ऑनलाईन अर्ज भरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दि.२३/१०/२०२१ रोजी सकाळी १०:०० वा.ते ११:३० वा.या वेळेत कोल्हापूर शहरातील व शहरालगतच्या परिक्षा केंद्रावर परिक्षा आयोजीत केलेली आहे. पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज भरलेल्या ८८१७ उमेदवारांना प्रवेश पत्र दि.२०/१०/२०२१ रोजी जी.ए.सॉप्टवेअर टेक्नॉलाजी प्रायव्हेट लिमिटेड बेंगलौर,कॅम्प पुणे या कंपनीकडून संबंधीत उमेदवारांच्या ई-मेलवर उपलब्ध करुन दिलेली असून सदर प्रवेश पत्र http://mahapolicerc.mahaitexam.in या पोर्टलवरुन देखील डाऊनलोड करता येणार आहे.

| अ.क्र. | परिक्षा केंद्र क्रमांक | परिक्षा केंद्राचे नाव | पत्ता | रोल नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | ४१०१ | राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज | कदमवाडी रोड, कोल्हापूर | ४११००००१ ते ४११००५७६ |
| २ | ४१०२ | श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय | २९६८ सी,दसरा चौक,कोल्हापूर | ४११००५७७ ते ४११००९३६ |
| ३ | ४१०३ | देशभुषण विद्यामंदीर | सोमवार पेठ, कोल्हापूर | ४११००९३७ ते ४११०११७६ |
| ४ | ४१०४ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल | जुना बुधवार पेठ, कोल्हापूर | ४११०११७७ ते ४११०१५८४ |
| ५ | ४१०५ | देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेज | रविवार पेठ, कोल्हापूर | ४११०१५८५ ते ४११०१८२४ |
| ६ | ४१०६ | गर्व्हमेंट पॉलिटेक्नीक | विद्यानगर, कोल्हापूर | ४११०१८२५ ते ४११०२४०० |
| ७ | ४१०७ | राजाराम कॉलेज | विद्यानगर, कोल्हापूर | ४११०२४०१ ते ४११०२८०८ |
| ८ | ४१०८ | न्यू मॉडेल इग्लिशस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज | ताराबाई पार्क कोल्हापूर | ४११०२८०९ ते ४११०३७६८ |
| ९ | ४१०९ | छत्रपती शाहू इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅन्ड रिसर्च (सायबर कॉलेज) | विद्यानगर, कोल्हापूर | ४११०३७६९ ते ४११०४२४८ |
| १० | ४११० | भारती विद्यापिठ | चित्रनगरी जवळ, कोल्हापूर | ४११०४२४९ ते ४११०४६०८ |
| ११ | ४१११ | महावीर कॉलेज | कोल्हापूर | ४११०४६०९ ते ४११०४९२० |
| १२ | ४११२ | विद्यापिठ हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज/डी.डी.शिंदे कॉलेज | भवानी मंडप, कोल्हापूर | ४११०४९२१ ते ४११०५२८० |
| १३ | ४११३ | संजय घोडावत युनिर्व्हसिटी | अतिग्रे,सांगली रोड,कोल्हापूर | ४११०५२८१ ते ४११०६६०० |
| १४ | ४११४ | डॉ. डी.वाय पाटील कॉलेज इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलाजी | कसबा बावडा,कोल्हापूर | ४११०६६०१ ते ४११०७२०० |
| १५ | ४११५ | विवेकानंद कॉलेज | ताराबाई पार्क, कोल्हापूर | ४११०७२०१ ते ४११०८१६० |
| १६ | ४११६ | अशोकराव माने इंजिनिअरींग कॉलेज | वाठार तर्फ, वडगांव | ४११०८१६१ ते ४११०८८१७ |

१. उमेदवारानी प्रवेश पत्रामध्ये दिलेल्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रवेशपत्रात नमूद केलेल्या परिक्षा केंद्रावर दि.२३/१०/२०२१ रोजी सकाळी ०८:०० वा.पर्यंत प्रवेशपत्रासह उपस्थित रहावे.उमेदवारांना परिक्षा केंद्रात सकाळी ०९:०० वा.ते ०९:३०वा. यावेळेत प्रवेश दिला जाणार असून त्यानंतर आलेल्या कोणत्याही उमेदवाराला परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

२. आवेदन अर्ज भरतेवेळी दिलेला फोटो प्रवेशपत्रावर चिटकवून प्रवेशपत्र घेवून यावे. प्रवेश पत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांनी परिक्षेकरीता काळा / निळा बॉलपेन घेवून यावे.परिक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवारांनी पर्यवेक्षकांच्या समोर प्रवेशपत्रावर स्वाक्षरी करावी.

३ शासनाने जारी केलेले आधारकार्ड,पॅनकार्ड,मतदान कार्ड,पासपोर्ट,महाविद्यालयीन ओळखपत्र,ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता येताना सोबत आणणेआवश्यक आहे.

४. उमेदवार व सोबत आलेले त्यांचे नातेवाईक यांनी कोवीड-१९ चे अनुषंगाने शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सॅनिटायजर, मास्कचा वापर करावा व सुरक्षित अंतर ठेवावे.

५. आपले सोबत अनावश्यक वस्तु आणू नये आणल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

६. एखादा उमेदवार लेखी परिक्षेस गैरहजर राहीला तर त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेणेबाबत कोणतेही स्वतंत्र संधी किंवा पुढील तारीख दिली जाणार नाही. तसेच त्या उमेदवारास संपुर्ण भरती प्रक्रीये मधुन अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवाराने दक्षता घेणेत यावी.

७. उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रीये मध्ये उध्दट वर्तन/गैरवर्तन केल्यास त्यास कोणतेही क्षणी भरती प्रक्रीये मधुन बाद करण्यात येईल.

८. पोलीस भरती प्रक्रीये मध्ये नियम बाहय दबाव/ वशिलेबाजी तसेच भ्रष्ट आचरण व वर्तणुक करणा-या उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल.

९. भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवारास काणेतीही शारीरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१०. कोल्हापूर पोलीस शिपाई भरती प्रक्रीया तटस्थपणे,नि:पक्षपातीपणे व पारदर्शक (Neutral,Impartial & Transparent) होणार असुन, दक्षता अधीकारी म्हणुन पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

११. उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिति अगर कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी सादर केलेचे किंवा खरी माहिति दडवून ठेवलेचे निदर्शनास आलेस त्यास त्यांच टप्यावर संपुर्ण भरती प्रक्रीयेतुन अपात्र करण्यात येईल

१२. कृपया उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणतेही एजंट/दलाल,अधिकारी/ कर्मचारी यांच्या भुल थापाना / अमीषाला बळी पडु नये यामध्ये कोणाचा वशिलेबाजी अगर ओळखीचा उपयोग केला जाणार नाही.उमेदवाराची निवड ही सर्वनिकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

१३. उमेदवारांनी दिनांक ०३/०९/२०१९ रोजीच्या दिलेल्या जाहिरातीमधील सर्व सुचनांचे नोंद घ्यावी व त्यांचे काटेकोर पालन करावे.

१४. पोलीस भरती दरम्यान काही अपरिहार्य कारणास्तव संबधीत परिक्षा/चाचण्या अगर इतर कोणतेही बाबतीत बदल करावयाचे झाल्यास ते अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात येतील.

**तसेच भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार / गैरकृत्य समजण्यात येईल.**

१. अर्जात हेतुपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहित पध्दतीने वितरित न करण्यात आलेले दाखले / कागदपत्रे सादर करणे.

२. परिक्षेसंबंधी या घटकाच्या मालकीचा कोणताही दस्तावेज उदा :- उत्तरपत्रिका,परिक्षेच्या कालावधीमध्ये प्रश्नपुस्तिका,हजेरीपट, उमेदवारांची ओळखपत्रे फाडणे,फेकूण देणे,सोबत घेवून जाणे कविां इतर अनधिकृत त्रयस्थ व्यक्तीकडे हस्तांतरित करणे.

३. परीक्षेकरीता आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही कर्मचा-यास उदा. पर्यवेक्षक, लिपिक, परीक्षा उपकेंद्र प्रमुख, सेवा पुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक, इत्यादी यांना त्रस्त करणे, धमकावणे अथवा शारीरिक इजा करणे अथवा तसा प्रयत्न करणे.

४. निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. - परीक्षा कक्ष अथवा परिसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे, इतर उमेदवारांना धमकावणे, इत्यादी प्रकारचे गैरवर्तन करणे.

५. निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. - परीक्षा कक्ष व कार्यालय इत्यादी ठिकाणी घातक शस्त्र अथवा ज्वलनशील पदार्थासह प्रवेश करणे.

६. निवड प्रकियेशी संबंधित ठिकाणे उदा. लेखी परीक्षा कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण व कार्यालय इत्यादी निषिध्द केलेल्या ठिकाणी स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, लेखन पॅड, पाऊच, परिगणक ( Calculator )इत्यादी प्रकारची साधने/साहित्य आणणे आणि /अथवा स्वत:जवळ बाळगणे आणि/अथवा त्याचा वापर करणे आणि अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेणे

७. निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. - परीक्षा कक्ष व मुख्य कार्यालय इत्यादी ठिकाणच्या पायाभूत सुविधा /सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधुस करणे अथवा विद्रुप करण्याचा प्रयत्न करणे.

८. स्वत:च्या उमेदवारीच्या अनुषंगाने स्वत: अथवा इतर व्यक्ती करवी अवैध मार्गाने निवड प्रक्रियेवर प्रभाव टाकणे अथवा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

९. निवड प्रक्रीये संदर्भातील कोणत्याही महत्वाचे कागदपत्रावर अश्लील अथवा अन्य आक्षेपार्ह लिखान करणे आणि/अथवा चित्रे/आकृत्या रेखाटणे.

१०. परिक्षेच्या उत्तर पुस्तीकेवरील सुचनांचे उल्लंघन करून उत्तर पुस्तीकेशी छेडछाड करणे आणि/अथवा उत्तरपुस्तीका यावर धमकावणारे लीखान करणे आणि/अथवा स्वत:ची ओळख दर्शविणारी कोणतीही चिन्हे लिहीणे किंवा उत्तर पुस्तीकेत कोणताही मजकुर लिहीणे, जो भरती प्रक्रीयेतील उमेदवाराची ओळख दर्शविण्यास मदत करेल.

११.तोतयेगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे आणि /अथवा कोणत्याही तोतया व्यक्तिची मदत घेणे अथवा मदत घेण्याचा प्रयत्न करणे.

१२.अवैध मार्गाने प्रश्नपत्रिका मिळविणे अथवा मिळविण्याचा प्रयत्न करणे,प्रश्नपत्रिका फोडणे अथवा फोडण्याचा प्रयत्न करणे, बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परिक्षेत अनाधिकृत साहित्या आधारे नक्कल करणे अथवा तत्सम गैरप्रकारचा प्रयत्न करणे.

१३.एखादया विशिष्ट निर्णयासाठी संघटीतपणे अथवा असंघटीतपणे कोणत्याही माध्यमातून भरती प्रक्रियेत दबाव आणणे अथवा दबावाचा प्रयत्न करणे.

१४.अर्जामधील सर्व दावे / माहितीची सत्यता तपासण्यासाठी कार्यालयाने मागणी केलेल्या आवश्यक कागदपत्रांचा पुरावा कार्यालयाच्या सुचनेनूसार कोणत्याही टप्प्यावर सादर न करणे.

१५.अर्जामधील दावा / माहिती आणि निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर सादर केलेल्या कागदपत्रांमधील दावा यामध्ये फरक / तफावत आढळून येणे.

१६.कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना हेतूपुरस्सर वस्तुस्थितीदर्शक माहिती नमुद न करणे, वस्तुस्थिती दडविणे, पुराव्यानिशी माहिती देणे, पत्रव्यवहारामध्ये खोटे / दिशाभुल करणारे आरोप करणे.

११. अर्जाद्वारे कार्यालयाकडे केलेला दावा अथवा सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे निवडीच्या अथवा निवडी नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश / नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम प्राधिका-याने प्रदान केली नसल्याचे आढळून येणे.

१२.भरती अध्यक्ष किंवा भरती परीक्षक इत्यादी यांना उमेदवाराने अथवा उमेदवाराच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने उमेदवाराच्या निवडीच्या अनुषंगाने दबाव आणण्याचा, प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

१३.स्वत:स अकारण / गैरवाजवी फायदा होण्यासाठी अथवा प्रसिध्दी देण्यापूर्वीची कोणत्याही स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी कर्मचा-यावर गैरवाजवी प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

१४.भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि समाज माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेवर चुकीचे आरोप करणे, की ज्यामध्ये भरती अध्यक्ष किंवा भरती प्रक्रियेतील सदस्य किंवा भरती प्रक्रियेस सहाय्य करणारे तज्ञ किंवा परिक्षक किंवा अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द निदर्शने, घोषणाबाजीद्वारे धाकदडपशा दाखवणे यांचा समावेश आहे.

## गैरप्रकार प्रकरणी कारवाई -

१. या घटकाकडुन राबविण्यात येणा-या परिक्षेत अथवा परीक्षेनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या परंतु गैरप्रकार करण्यास सहाय्यभूत ठरणा-या व्यक्तींवर प्रचलित कायदा व नियमानुसार फौजदारी अभियोग दाखल करुन कारवाई करण्यात येईल.

२. उपरोक्त कृत्यांपैकी प्रकरणपरत्वे एक किंवा अनेक कृत्य करणे किंवा करण्यास प्रयत्न करणे किंवा करण्यास अपप्रेरणा देणे, यांकरीता संबंधीत कायदयानुसार फौजदारी अभियोग दाखल करण्यासह पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अ.** संबंधीत निवड प्रक्रियेस अनर्ह ठरविणे.

**ब.** या घटकाच्या मार्फतीने आयोजित सर्व परिक्षा अथवा निवड प्रक्रियांकरीता कायमस्वरुपी किंवा ठरावीक कालावधीकरीता प्रतिरोधीत करणे.

**क.** गैरप्रकाराच्या अथवा गैरप्रकाराच्या प्रयत्नांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविलेल्या उमेदवार / व्यक्तीची शिफारस रदद करणे व त्यानुसार संबंधीत विभाग, कार्यालयाकडून सेवा समाप्तीची कार्यवाही.

**ड.** उमेदवार शासकीय नोकरीत असल्यास, उचित नियमांतर्गत शिस्तभंग विषयक कारवाई.

**महाराष्ट्र शासनाकडून पोलीस शिपाई भरती प्रक्रियेबाबत विहित करण्यात आलेल्या सर्व अर्हता विषयक अटी पुर्ण न करणा-या अथवा कोणत्याही प्रकारे गैरप्रकारचा प्रयत्न करणा-या उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल आणि / किंवा सदर उमेदवार इतर योग्य अशा कारवाईस पात्र असेल.**

**विशेष सुचना - उमेदवारांनी पोलीस शिपाई भरती - २०१९ संदर्भात महाराष्ट्र पोलीस व कोल्हापूर पोलीस दलाचे संकेतस्थळावर नियमित अपडेटस तपासत / पाहत रहावे.**

---****---